EXPORT NOTE


**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय**

**जिल्हा उद्योग केंद्र, हिंगोली**

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, एस-12, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, हिंगोली-431513.

ई-मेल : didic.hingoli@maharashtra.gov.in — दुरध्वनी क्र.:02456-222218


जा.क्र.जिउकेंहिं/Export/2023 / — दिनांक 20/04/2023

## जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दिनांक 19/04/2023 चे इतिवृत्त

जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दिनांक 19.03.2022 रोजी सकाळी 12.30 वाजता मा. श्री जितेंद्र पापळकर भा.प्र.से. जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली येथे सपन्न झाली सर्व प्रथम महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव जिल्हा निर्यात प्रचालन समिती, हिंगोली यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. व मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभेस सुरवात केली.

- मागील बैठक दिनांक 27.02.2023 च्या सभेच्या इतिवृताचे वाचन करण्यात आले. यावर सविस्तर चर्चा करुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
- महाव्यवस्थापक जिउकें यांनी महाराष्ट्राच्या निर्यातीमध्ये जिल्हयाचे योगदान, Export Action Plan, ODOP Product ची निवड, व इतर वस्तु निर्याती मधील संधी , हाळद निर्यातीमधील संधी इत्यादि बाबत चर्चेची सुरवात केली यावर मा. अध्यक्ष यांनी हळदिच्या निर्याती बाबत प्रामुख्याने लक्ष घालुन जिल्हयाची निर्यात वाढविण्यासाठी सर्व आवश्यक ते सहकार्य करण्यास जिल्हा प्रशासन दक्ष असल्याबाबत सांगीतले.
- श्री मयुर मंत्री सनदी लेखापाल यांनी हाळदी व्यतीरीक्त शुगरकेन, जॅगरी इत्यादी कृषि उत्पादनाची निर्यात वाढविणे गरजेचे असल्याचे सांगितले. तसेच जिल्हयात बायर सेलर मीट, आयोजित करुन उद्योजकाचे निर्याती बाबत प्रबोधन करावे अशी सूचना केली. यावर मा. अध्यक्ष यांनी कृषि विभाग, केव्हीके, पनन औरंगाबाद ,अपेडा,स्पाईस बोर्ड यांचे मार्फत गुळाच्या निर्याती करीता निर्यातक्षम फार्मर प्रोडयुसर कंपनी तयार करावी. तसेच पुढील काळात कृषि विभाग, जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, डिजीएफटी,नागपुर यांनी समन्वयाने हिंगोली येथे बायर सेलर मीट आयोजीत करण्याबाबत मुख्यालयाच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करावे असे सूचविले.
- श्री प्रमोद तायडे डीजीएफटी, नागपुर यांनी गुगल मीट द्वारे बैठकीस सहभागी होऊन निर्यातदारासाठी डिजीएफटी मार्फत देण्यात येणा-या योजना बाबत माहिती दिली. यावर मा. अध्यक्ष यांनी त्यांना जिल्हयाच्या निर्यातदाराच्या माहितीसाठी तसेच प्रशासना मार्फत राबविण्यात येणा-या कार्यक्रमासाठी बायर्स व सेलर्स यांची यादी उपलब्ध करुन जिल्हा उद्योग केंद्र, यांच्याकडे देण्यात यावी असे सूचित केले.
- श्री प्रल्हाद बोरगड निर्यातदार वसमत यांनी वसमत येथे असलेल्या केळी निर्यात केंद्रासाठी Express Feeder ची आवश्यकता असून त्यामुळे अजुबाजूच्या परीसरातील 800 शेतक-यांना त्याचा फायदा होईल. व त्यामुळे जिल्हाच्या निर्यातीत वाढ होईल. असे सांगीतले यावर मा. अध्यक्ष यांनी याबाबत पणन महासंघाने त्वरीत कार्यवाही करुन प्रस्ताव तयार करावा. व जिल्हा उद्योग केंद्रामार्फत मुख्यालयास सादर करुन पायाभुत सुविधा अंतर्गत मंजूर करुन घ्यावा असे सूचविले.
- शेवटी महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, हिंगोली यांनी सर्वाचे अभार मानुन मा.अध्यक्ष यांच्या परवाणगीने सभा संपल्याचे जाहिर केले.


मा.जि. ... 144 ... 3-5-23


मा. जिल्हाधिकारी
तथा अध्यक्ष
निर्यात प्रचालन समिती

महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र, हिंगोली